Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV | ISSUE-III | MAR. | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Vol - IV Issue-III MARCH 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांमधील दलित पात्रांचा विद्रोह

**प्रा.डॉ. लहू दिगंबर वाघमारे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव,
ता. चाकूर, जि. लातूर.

व्यंकटेश माडगूळकरांनी दलित जीवनातील विविध समस्यांचे आणि दलितांच्या भाव-भावनांचे व विविध वृत्ती-प्रवृतींचे चित्रण केले आहे. त्यांच्यातील कलानिष्ठा, सहनशीलता काही कथांमधून जशी व्यक्त झाली आहे, तशीच 'देवा सटवा महार', 'गोडं पाणी', 'अखेर आकण्या घरी आला', 'कोंडिबा गायकवाड', 'सांगण्यासारखं गाव' इ. काही कथांमधून त्यांच्यातील संघर्षशीलता व विद्रोहाची भावना व्यक्त झाली आहे. विषम समाजव्यवस्थेमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सोशीकता व शरणता निर्माण झाली आहे; परंतु काही पात्रे एका विशिष्ट मर्यादेपर्यंत हा अन्याय-अत्याचार सहन करतात. ही मर्यादा संपल्यावर मात्र त्यांच्यातील स्वाभिमान जागा होतो व ते सवर्णांबरोबर संघर्ष करतात. त्यात ते फारसे यशस्वी होत नाहीत किंवा त्यांच्या संघर्षामुळे त्यांच्या जीवनातही परिवर्तन होत नाही; परंतु तसा प्रयत्न काही पात्रे करताना दिसतात.

'कोंडिबा गायकवाड' या कथेतील सवर्ण असलेले कोंडिबा गायकवाड दलित श्रावणवर चोरीचा आळ घालून त्याला मारतात. खरे तर त्यांनी ती चोरी केलीच नव्हती तरीही त्याला कबूल करण्यासाठी आसुडाचे फटके मारून त्याची पाठ फोडून काढली जाते व त्यांच्या पाठीच्या चिंध्या केल्या जातात. श्रावणवर झालेला हा अमानुष अत्याचार पाहून श्रावण व इतर सर्व महार मंडळी संतापतात. या अन्यायाच्या विरुध्द तालुक्याच्या गावी जाऊन फौजदारापुढं श्रावणची पाठ उघडी करून दाखवताना ते म्हणतात, "सरकार, हेचा न्याय करा. गोरगरिबाची कड घ्या"[१] येथे जनतेच्या कल्याणासाठी नेमलेल्या विविध अधिकाऱ्यांकडूनही येथील दलितांवर अन्याय-अत्याचार करण्यात आले याचे कारण तेअधिकारीही सवर्णच आहेत. आधिकाऱ्यामुळे येथील दलितांची कुचंबणा झाली. या कथेतील महारांनी केलेल्या तक्रारीचा फारसा फायदा किंवा परिणाम झाला नाही; उलट फौजदार कोंडिबा गायकवाड यांना बोलावून घेतो व तेथे आल्याबरोबर कोंडिबा गायकवाड फौजदाराला ५०० रु. देऊन त्याची मूठ भरतो. कायदा आणि न्याय आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न करतो आणि त्यात तो यशस्वी होतो. दलितांची बाजू कोणीही घेत नाही; परंतु या कथेतील महार विद्रोहाचा आणि संघर्षाचा प्रयत्न तरी करतात. व्यंकटेश माडगूळकर ज्या काळात कथालेखन करीत होते त्या काळात दलितांना कोंडिबा गायकवाडसारख्या गुंड प्रवृत्ती असलेल्या व्यक्तीच्या विरोधात टक्कर देऊन त्याची तक्रार करणे हे अत्यंत धैर्याचे काम आहे. कारण त्या काळात सवर्ण दलितांवर खूप अन्याय, अत्याचार करीत होते म्हणून तक्रार करणे कठीण होते. या परिस्थितीतील त्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद वाटतो. 'अखेर आकण्या घरी आला' या कथेतून दलितांच्या संतापाचे व सवर्णांविरुध्दच्या विद्रोहाचे चित्रण आले आहे. या कथेत आकण्याला सवर्ण निवेदक मारहाण करतो व जखमी करतो म्हणून सवर्ण महार मंडळी निवेदकाच्या घरची कामे करण्यावर बहिष्कार टाकतात; परंतु निवेदकाच्या वडिलांनी आपण त्याच्यावर वेळोवेळी केलेल्या उपकाराची जाणीव करून त्यांना विचार करायला सांगितल्यावर सर्व महार मंडळी माघार घेतात आणि निवेदकाच्या वडिलांना शरण येतात. आकारामची समजूत घालण्यासाठी आपण होऊन हा फार्स केल्याचेही ते सांगतात. हे आकण्याला कळते तेव्हा आकण्या संतापतो व शरण आलेल्या महार मंडळीना उद्देशून म्हणतो, "अरं तुमी हातात काकनं घातली. तुमाला 'मी' पणाच न्हाई. तुमी करा काम, खा लाथा, ह्यो आकाराम मातूर बामनाचं काम जिवात जीव हाय तोवर करनार न्हाई. पुना या वाड्यात जो पाऊल ठेवल, तो महाराच्या वसाचा न्हवं !"[२] आकण्याच्या या संवादातून त्याचा या वर्णव्यवस्थेविरुध्द व सवर्णांनी दलितांवर केलेल्या अन्यायाविरुध्द संताप, चीड व्यक्त झाली आहे. महार मंडळीने स्वीकारलेल्या लाचारीविरुध्द हा संताप आहे. भारतातील वर्णव्यवस्थेने निर्माण केलेल्या जातीयतेमुळे आणि त्यातून निर्माण झालेल्या अस्पृश्यतेमुळे येथील दलितांना सवर्णांच्या घरची अनेक कामे करावी लागली. त्यामोबदल्यात त्यांना शिळे तुकडे मिळाले. हे काम जर त्यांनी बंद केले, तर त्यांना जगणेच अशक्य होते. हे भयावह वास्तव या कथेतून आले आहे. तसेच बहिष्कार टाकलेल्या ब्राह्मण निवेदकाच्या घरची कामे पुन्हा महार दलितांनी स्वीकारली व ते लाचार झाले त्याबद्दलचा आकण्याचा राग, संताप व विद्रोह या कथेतून व्यक्त झाला आहे.

व्यंकटेश माडगूळकर ज्या कालखंडात लेखन करीत होते त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य सुरू होते. अस्पृश्यता निवारणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध प्रकारचे कृतिकार्यक्रम हाती घेतले होते. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा !' ही शिकवण त्यांनी दलित समाजाला दिली होती. त्यामुळे दलित समाजात जागृती निर्माण होत होती. खेड्यापाड्यातही या विचारांचे काही परिणाम प्रत्यक्ष दिसत होते. या सर्व परिस्थितीचे वास्तव चित्रण व्यंकटेश माडगूळकरांच्या काही कथांमधून आविष्कृत झाले आहे.

'गोडं पाणी' या कथेत दलितांतील महार मंडळी गावात पिण्याच्या पाण्यासाठी विहीर खोदतात. या विहिरीला गोडे पाणी लागते, हे पाहून सवर्ण मंडळी खवळतात व ही गोड्या पाण्याची विहीर आपल्या ताब्यात घेण्यासाठी दलितांवर दबावतंत्राचा वापर करतात. त्यांच्याविरुध्द कोर्टात जाण्याची भीती दाखवतात तेव्हा येताळनाना या विहीर खोदण्याच्या चुकीबद्दल स्वतःला दोषी समजतो. आपला अपराधीपणा व्यक्त करतो. त्याच्या या दुर्बल मानसिकतेबद्दल व भित्रेपणाबद्दल संकऱ्या म्हणतो, "नाना, तू का भितोस? जाऊ दे त्येस्नी कोरटात आपल्याबी लोकास्नी इचारनारं कुणी हायेच की ! आता पयला काळ राहीला न्हाई. पार पंतपरदानाम्होरं जाऊ तुका भेला हायेस."[३] डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीमुळे व लोकशाहीतील न्याय्य हक्कांमुळे काहीसा जागृत झालेला दलित समाज येथे चित्रित झाला आहे. संकऱ्या हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील स्वाभिमानी व आत्मभान जागृत झालेला प्रतिनिधी वाटतो. या कथेत उर्वरित सर्व महार मंडळी सवर्णाला शरण येतात; परंतु संकऱ्या मात्र त्यांना भीत नाही. आपल्यावर जर अन्याय झाला, कोर्टात केस झाली तर आपणही न्याय मागू शकतो याची जाणीव संकऱ्यामध्ये निर्माण झाली आहे. त्याच्या स्वाभिमानी वृत्तीचे, त्याच्यातील निर्भीडतेचे, विद्रोही व्यक्तिमत्त्वाचे व त्याच्या विचाराचे दर्शन येथे प्रातिनिधिक रूपामध्ये घडते.

'सांगण्यासारखं गाव' या कथेतून लेखकांनी सांगली जिल्ह्यातील एका खेड्याचे प्रातिनिधिक रूपात दर्शन घडवले आहे. या गावात काळाच्या ओघात झालेले परिवर्तन त्यांनी निवेदनाच्या शैलीत सांगितले आहे. याच गावातील महार मंडळीचा काळानुसार झालेला धर्मांतराचा बदल लेखकाने येथे टिपला आहे. "बौध्द धर्म स्वीकारलेली महार मंडळी गावकीचं काम करीनाशी झाली. बलुत्याची प्रथा मोडकळीस आली."[४] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हाकेला ग्रामीण भागात प्रतिसाद मिळाला. त्यांनी दिलेल्या शिकवणुकीमुळे दलित समाज जागृत झाला. काहींमध्ये स्वाभिमान जागृत झाला. त्यामुळे काही अस्पृश्य दलित जातीतील व्यक्तींनी पारंपरिक बलुतेदारांची कामे नाकारली, लाचारीचे जिणे सोडले आणि विषमताधीष्ठित परंपरावादी व कर्मठ असलेल्या हिंदू धर्माचा त्याग करून त्यांनी डॉ. आंबेडकरांसोबत नव्या समतावादी धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक व क्रांतिकारक घटनेचे चित्रण व्यंकटेश माडगूळकर यांनी वास्तवपणे केले आहे. ही कामे दलितांनी नाकारण्यामागेही दलितांची विद्रोही व संघर्षशील भूमिका आहे. हिंदू धर्मातील दलित समाजाला जाचक ठरणाऱ्या अनेक बाबी दलितांनी नाकारल्या त्यातून त्यांचा स्वाभिमान व त्यांचे विद्रोही व्यक्तिमत्व व्यक्त होते.

'देवा सटवा महार' ही दलित समाजाच्या विद्रोहाचे दर्शन घडविणारी व्यंकटेश माडगूळकरांची अत्यंत महत्त्वाची कथा आहे. दलितांच्या दास्यत्व या वृत्तीबरोबर त्यांच्यात असलेल्या स्वाभिमानी वृत्तीचेही दर्शन लेखकांनी या कथेतून घडविले आहे. दलितांच्या आक्रमक विद्रोहाचे रूप या कथेतून पाहवयास मिळते. देवा या एकाच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात दास्यत्व, गुलामगिरी, लाचारी, स्वाभिमान आणि विद्रोह असे विविध भाव व भूमिका व्यंकटेश माडगूळकरांनी चित्रित केल्या आहेत. देवा गावकीची कामे करतो आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून जेव्हा अन्याय-अत्याचार होतो तेव्हा तो विद्रोह करून उठतो. एकाच व्यक्तीमध्ये अशा दुहेरी भूमिका निर्माण करूनसुध्दा कथेच्या सौंदर्यात व एकसंधतेत कुठेही विसंगती निर्माण होत नाही. देवा हा गावकामगार दलित महार असून तो गावातील गावकीची सर्व कामे करतो. एके दिवशी तालुक्याहून लहान मुलांना देवी टोचण्यासाठी डॉक्टर येतो. तो सरकारी अधिकारी असल्यामुळे व देवा त्याचा गावकामगार असल्यामुळे तो देवी डॉक्टर त्याला लहान मुलांना देवी टोचण्यास दवाखान्यात घेऊन येण्यास सांगतो. देवा घरोघर जाऊन मुलांना घेऊन येण्यास सांगतो; परंतु लहान मुले तेथे येत नाहीत. तेव्हा डॉक्टर संतापतो, रागावतो व देवाला जातिवाचक आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करतो. ही शिवी ऐकून देवाही संतापतो. प्रारंभी तो या डॉक्टरला अत्यंत विनंतीवजा बोलतो व आपण मुलांना घेऊन येण्यास सांगितल्याचे सांगतो; परंतु डॉक्टर ते खरे मानीत नाही. म्हणून तो त्याला त्रास देतो, शिव्याशाप देतो. तेव्हा मात्र देवा अत्यंत संतापतो व चावडीवर उभा टाकून शिव्या देणाऱ्या डॉक्टरला म्हणतो, "अरं ए बोंबलीच्या, चावडीचं जोतं उतरून खाली ये, शिव्या देणारं तुजं थोबाड फोडतो ह्या तुटक्या जोड्यानं."[५] देवा एका सवर्ण अधिकाऱ्याविरुध्द असा टोकाचा विद्रोह पुकारतो. डॉक्टरांकडून होणारा अन्याय-अत्याचार व शिव्याशाप तो सहन करीत नाही. देवाने

डॉक्टरला असे बोलल्याची चर्चा गावभर होते. गावातील सवर्ण मंडळी साहेब पंत सरकारकडे जाण्याची व तुरूंगात जाण्याची भीती देवाला सांगतात तेव्हा निर्भीड व स्वाभिमानी असलेला देवा त्यांना म्हणतो, "पंत सरकार म्होरं, तर पाक दिल्लीच्या राजाकडं जाऊ दे, मी न्हाई भेनार, श्याप सांगन पंतसरकारला 'तुमी अंमलदार नेमल्याती, तेना काय महार लोकांस्नी आई भनीवरनं शिव्या देयाचा हुकूम दिला काय? म्हणून कुणीबी टिकूजीनं येवं अन आमास्नी चेंडूवानी ठेवलाव, म्हणजे हाय काय?"[६] देवा डॉक्टरवर जोडा काढतो. त्याला तोडीस तोड बोलतो आणि त्याच्याकडून गावकामगार आणि दलित म्हणून होणारा अन्याय-अत्याचार पंतसरकारापुढे मांडण्याचे सामर्थ्य दाखवतो. यावरून त्याचा निर्भीडपणा व्यक्त होतो. याच कथेत डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी कार्याचे वर्णनही आले आहे. तक्यात डॉ. आंबेडकरांचे तैलचित्र लावले आहे. मुंबईला राहिलेला व चार बुकं शिकलेला मारूती बाबासाहबांचे कार्य व मोठेपणा इतर महार मंडळींना सांगतो. सवर्ण नेत्यांबरोबर बाबासाहेबांचे बसणे, फिरणे व बाबासाहेबांचे इतरही प्रेरणादायी कार्य तो सांगतो. या बाबासाहेबांच्या कार्याने देवाचे ऱ्हदय भरून येते, त्याला हुरूप येतो, त्याच्या विद्रोहामागे बाबासाहेबांच्याच कार्याची प्रेरणा असल्याचे दिसते. बाबासाहेबांच्या चळवळीचा परिणाम समाजमनावर कशा प्रकारे झाला होता, याचे चित्रण येथे पाहवयास मिळते. प्रस्तुत कथेतून देवाच्या व्यक्तिचित्रणात लेखकाने विविध वृत्ती-प्रवृतींचा समन्वय साधला असून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ही विद्रोही भावना म्हणजे त्याची अतिउच्च अशी आदर्श भावना होय.

व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या काही कथासंग्रहातून दलित समाजातील विद्रोही वृत्तीची पात्रे उभा करून दलित समाजाच्या स्वाभिमानी वृत्तीचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या लेखनातून दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे चित्रण विपुल प्रमाणात आले आहे. त्याचबरोबर दलितांतील नकार व विद्रोही भावनेचे दर्शनही काही मोजक्या पात्रांच्या चित्रणातून आले आहे. डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा समाजावर प्रत्यक्ष पडलेला प्रभाव व त्यातून जागृत झालेला दलित समाज याचेही प्रातिनिधिक चित्रण व्यंकटेश माडगूळकर यांनी काही पात्रांच्या व प्रसंगाच्या वर्णनातून केले आहे.

**संदर्भ :-**

१. व्यंकटेश माडगूळकर, 'माणदेशी माणसे', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९९७, पृष्ठ ३६.
२. गो. मा. पवार (संपा.), 'ओझं', व्यंकटेश माडगूळकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पुनर्मुद्रण १९९४, पृष्ठ ६५.
३. व्यंकटेश माडगूळकर, 'उंबरठा', उत्कर्ष प्रकाशन, पुण, दुसरी आवृत्ती, १९८३, पृष्ठ २३.
४. व्यंकटेश माडगूळकर, 'पारितोषिक', उत्कर्ष प्रकाशन, पुण, प्रथमावृत्ती, १९८२, पृष्ठ ११६.
५. गो. मा. पवार (संपा.), 'ओझं', व्यंकटेश माडगूळकर, उपरोक्त, पृष्ठ १०.
६. कित्ता, पृष्ठ ४.